EQG

2011

670161

**मराठी वाङ्मय (वैकल्पिक)**
**(प्रश्नपत्रिका – 1)**

**स्तर : पदवी**
**स्वरूप : पारंपरिक**

**एकूण गुण : 200**
**कालावधी : 3 तास**

*सूचना :*

1) ***सर्व*** *प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहावीत.*
2) *प्रश्न क्र. 1* ***हा अनिवार्य आहे.*** *उर्वरित प्रश्नांपैकी प्रत्येक विभागातून एक, याप्रमाणे* ***चार*** *प्रश्न सोडवा.*
3) *प्रश्नाच्या* ***उजवीकडील*** *अंक त्या प्रश्नाचे* ***गुण*** *दर्शवितात.*
4) *ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्न संख्ये इतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*
5) *तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास जास्त गुण देण्यात येतील.*
6) *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

SEAL

गुण

1. खालीलपैकी कोणतेही **चार** उपप्रश्न सोडवा (प्रत्येकी 10 गुण) :

(अ) मराठी भाषेच्या उत्पत्ती संबंधी महत्त्वाच्या मतांचा परामर्श घ्या. 10

(ब) भाषांतराची पूर्वतयारी करण्यासाठी कोणत्या गोष्टी विचारात घ्यायच्या असतात ते स्पष्ट करा. 10

(क) १९६० नंतरच्या दलित कथेतून दलितांना सामाजिक हक्कांची जाणीव कशी झाली ते स्पष्ट करा. 10

(ड) व्यवहार भाषा आणि शास्त्रीय साहित्याची भाषा यांतील फरक स्पष्ट करा. 10

(इ) आकाशवाणी या संपर्कमाध्यमाचे महत्त्व स्पष्ट करा. 10

## विभाग – अ

2. खालील उपप्रश्न सोडवा :

(अ) भाषा हे ललितसाहित्याचे साधन आहे की माध्यम ते स्पष्ट करा. 10

(ब) मराठी भाषेवरील फारसी भाषेचा प्रभाव सोदाहरण स्पष्ट करा. 10

(क) शब्दांच्या जाती सोदाहरण स्पष्ट करा. 10

(ड) काळ ही कल्पना स्पष्ट करून तीनही काळांतील उपप्रकारांची माहिती लिहा. 10

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

3. खालील उपप्रश्न सोडवा : गुण

(अ) रूपिम ही संकल्पना स्पष्ट करून रूपिमांचे प्रकार विशद करा. 10

(ब) मराठीतील विभक्ती प्रत्ययांची नोंद करा. 10

(क) भाषा व व्याकरण यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा. 10

(ड) प्रयोग म्हणजे काय ते सांगून प्रयोगाचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा. 10

## विभाग – ब

4. खालील उपप्रश्न सोडवा :

(अ) ज्ञानभाषा म्हणून मराठी भाषेचा विकास कसा साधता येईल, ते लिहा. 15

(ब) लोकदैवताच्या उपासनाविधीचे स्वरूप विशद करा. 15

(क) कथात्मक लोकगीतांचे स्वरूप स्पष्ट करा. 10

5. खालील उपप्रश्न सोडवा :

(अ) भाषांतराचे स्वरूप स्पष्ट करून त्याचे प्रकार सांगा. 15

(ब) लोककथांतून जातीजमातींचे चित्रण कसे केले जाते, ते लिहा. 15

(क) लोकसाहित्याच्या विविध व्याख्या देऊन लोकसाहित्याने केलेल्या वाङ्मयीन कार्याचे समालोचन करा. 10

www.mpscmaterial.com

## विभाग – क

6. खालील उपप्रश्न सोडवा :

(अ) महानुभाव पंथाच्या वाङ्मयीन कार्याचा परामर्श घ्या. 10

(ब) ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीतील काव्यसौंदर्य उलगडून दाखवा. 10

(क) सामाजिक कादंबऱ्यांचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा. 10

(ड) दलित साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा. 10

7. खालील उपप्रश्न सोडवा :

(अ) शिवपूर्वकालीन बखरींचा परिचय करून द्या. 10

(ब) वामनपंडितांच्या रामचरित्रविषयक रचनांच्या वैशिष्ट्यांचा परिचय करून द्या. 10

(क) दलित कादंबऱ्यांच्या प्रेरणांचा परामर्श घ्या. 10

(ड) ग्रामीण कथेचा स्वरूप विचार स्पष्ट करा. 10

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग – ड

गुण

8. खालील उपप्रश्न सोडवा :

(अ) मार्क्सवादी समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करा. 10

(ब) साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे विशेष विशद करा. 10

(क) भारतीय साहित्य-विचारातील 'रस' ही संकल्पना स्पष्ट करा. 10

(ड) साहित्य आणि समाज यांचे परस्परसंबंध विशद करा. 10

9. खालील उपप्रश्न सोडवा :

(अ) साहित्यमूल्यमापनासाठी उपयुक्त मार्क्सवादी समीक्षापद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा. 10

(ब) मराठी भाषिक व्यवहारातील रूपक आणि प्रतिमा या संकल्पना स्पष्ट करा. 10

(क) साहित्याच्या वर्गीकरणाची आवश्यकता स्पष्ट करा. 10

(ड) स्वप्न व काव्य या संकल्पनांमागील फ्राइड व प्रिस्कॉट यांची भूमिका स्पष्ट करा. 10

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial